# विद्यार्थ्यांनी केली सायबर सुरक्षेविषयक जनजागृती



भंडाराः क्विक हिल फाऊंडेशनच्या विद्यमाने सुरु झालेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अंतर्गत भंडारा येथील ज.मु. पटेल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भंडारा बसस्थानकात कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन करुन जनजागृती केली. महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागाचे वृषांक कुंदन लांडगे व जय प्रदीप धनरे या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची गरज अधोरेखित केली. मोबाईलचा वापर करत असताना इंटरनेट व सायबर सुरक्षित व सतर्क राहणे गरजेचे असते, हे देखील उदहारणासह पटवून दिले. सायबर वॉरिअर वृषांक लांडगे व जय धनरे यांनी तेथे उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेबाबत इत्यंभूत माहिती देऊन स्वतःला व स्वतःच्या परिवाराला कसे सुरक्षित राहावे या बाबत मार्गदर्शन केले. बसस्थानकातील कर्मचाऱ्यांना क्विक हिल फाऊंडेशनतर्फे उत्कृष्ठ व्यासपीठ मिळाले असल्याचे आगार प्रमुख सारिका लिमजे यांनी सांगितले. यासाठी फाऊंडेशनच्या अनुपमा काटकर व अजय शिर्के यांचे त्यांनी आभार मानले.